पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

**दिनांक- ०१/०२/२०२१**

## गडचिरोली पोलीस दलाच्या पुढाकाराने अतिदुर्गम भागातील १५० बेरोजगार युवतींना मिळाला रोजगार

गडचिरोली जिल्हा पोलीस दलाच्या वतीने जिल्ह्यातील बेरोजगार युवक-युवतींकरीता **“रोजगार मेळावा ॲप”** तयार करण्यात आले असुन, सदर ॲपच्या माध्यमातुन गरजु युवक-युवतींना रोजगाराची संधी उपलब्ध करुन देण्याच्या उद्देशाने मा. पोलीस अधीक्षक सा. यांचे मार्गदर्शनाखाली प्रभारी अधिकारी नागरी कृती शाखा यांनी अथक परिश्रम घेवुन जिल्हयातील पोलीस उपविभागाअंतर्गत पोस्टे, उपपोस्टे व पोमकें हद्दीतील १५० बेरोजगार युवतींना गडचिरोली पोलीस दल व पार्कसन्स स्किल इन्स्टयीटयुट नागपुर यांचे संयुक्त विद्यमानाने नर्सिंग असिस्टंटचे प्रशिक्षण देऊन रोजगार प्राप्त करुन देण्यात आलेला आहे. आतापर्यंत १०६० युवतींना नर्सिंग असिस्टंट म्हणुन रोजगार उपलब्ध करुन देण्यात आले असुन, २६३ युवकांना तेलंगाणा व हैदराबाद येथे सुरक्षारक्षक म्हणुन व २३ युवकांना हॉस्पीलीटी प्रशिक्षण देवुन रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला आहे.

दिनांक ०१/०२/२०२१ रोजी पोलीस मुख्यालय परिसरातील एकलव्य हॉल गडचिरोली येथे रोजगार प्राप्त १५० युवतीं करीता सत्कार समारंभ व नियुक्तिपत्र वाटप कार्यक्रम पार पाडण्यात आला. या कार्यक्रमात रोजगार प्राप्त उमेदवारांना मा. पोलीस अधीक्षक श्री. अंकित गोयल सा़े. यांनी मार्गदर्शन केले असुन, त्यांच्या उज्वल भविष्याकरीता शुभेच्छा दिल्या आहेत. यावेळी मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. समीर शेख सा़े. तसेच पार्कसन्स स्किल इन्स्टयीटयुट नागपुरचे केंद्रप्रमुख मा. श्री. नितीन ठाकरे, केंद्रसमन्वयक मा. श्री. योगेश रासेकर, प्रशिक्षक श्रीमती स्नेहा मेश्राम, सल्लागार श्रीमती संगिता रहाटे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता मा. पोलीस अधीक्षक श्री. अंकित गोयल यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हयातील सर्व उपविभागीय पोलीस अधिकारी, पोस्टे, उपपोस्टे व पोमकेंचे सर्व प्रभारी अधिकारी तसेच नागरी कृती शाखेचे प्रभारी अधिकारी श्री महादेव शेलार व कर्मचारी यांनी अथक परिश्रम घेतले.





